दि. 04/11/2026

प्रेसनोट

पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची चाकूर मध्ये चंदन तस्करांवर कारवाई

11 लाख 70 हजारांचे 540 किलो चंदन जप्त

लातूर जिल्ह्यातील चाकूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, मोठ्या प्रमाणावर चंदनाचा अवैध साठा केला असल्याची माहिती पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांना प्राप्त झाली होती.

सदर माहितीवरून, दिनांक 03.11.2026 रोजी विशेष पथकाने लातूर जिल्ह्यातील चाकूर पोलीस ठाण्याचे हद्दीतील मौजे आनंदवाडी येथे चापोली - नायगाव रोडलगत असलेल्या शेतामध्ये छापा टाकला असता, सदर ठिकाणी प्रतिबंधित चंदनाचे लाकूड पांढऱ्या रंगाच्या पोत्यांमध्ये भरून ठेवलेले आढळून आले. सदर ठिकाणावरून पथकाने 11,70,000/- रुपयांचे 540 किलो चंदन जप्त केले आहे.

सदर प्रकरणात पथकाने, 1) नरसिंग रामा बुंदराळे, वय 50 वर्ष, रा. आनंदवाडी, ता.चाकूर जि. लातूर 2. वसंत भानुदास चानकाणे, वय 40 वर्ष, रा. वाढवणा, ता. उदगीर, जि. लातूर 3. संतोष वैजनाथ चानकाणे, वय 35 वर्ष, रा. वाढवणा, ता. उदगीर, जि. लातूर व 4. बालाजी भानुदास चानकाणे, वय 42 वर्ष, रा. वाढवणा ता. उदगीर जि. लातूर यांच्याविरुद्ध चाकूर पोलीस ठाणे येथे गुरनं 594/2026 कलम 303(2), 3(5) भारतीय न्याय संहिता, कलम 41, 42 भारतीय वन अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला असून, सध्या त्याचा तपास सुरू आहे.

सदर कारवाईत, पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड, पोहेकॉ/ संदिप वाघाडे व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या : अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड